# संदेश

देशात व राज्यात १८८१ पासून कारखाने अधिनियम अंमलात आणण्यात आलेला आहे. स्वातंत्र्यानंतर संपूर्ण भारतातील कारखान्यातील कामगारांची सुरक्षा, आरोग्य व कल्याणाकरिता कारखाने अधिनियम, १९४८ हा सर्वसमावेशक कायदा लागू करण्यात आला. कारखाने अधिनियम, १९४८ व त्या अंतर्गत तयार करण्यात आलेला महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मधील तरतुदींची अंमलबजावणी कामगार विभागांतर्गत असलेल्या औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत करण्यात येते.

महाराष्ट्र राज्य हे देशातील औद्योगिक क्षेत्रातील अग्रेसर राज्य आहे. आजमितीस राज्यात औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांचेकडे कारखाने अधिनियमांतर्गत ३७१०० नोंदणीकृत कारखाने असून यामध्ये २५,४८,६२१ कामगार कार्यरत आहेत.

कारखाने अधिनियम व त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन कारखान्यात होणा-या अपघातांची संख्या कमी करणे व शक्यतो अपघात होणार नाहीत याबाबत दक्षता घेऊन कामगारांच्या आरोग्याचे रक्षण करणे हे या संचालनालयाचे प्रमुख ध्येय आहे. त्याचाच भाग म्हणून कामाच्या ठिकाणी अपघात प्रतिबंधात्मक सुरक्षा संस्कृतीचा अवलंब करणे व त्याचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे. कामाच्या ठिकाणी सुरक्षा व आरोग्यसंदर्भात नियमांचे काटेकोर पालन केल्यास कारखान्यातील अपघातांची संख्या कमी होईल, यासाठी कामगार व व्यवस्थापन यांच्या सांघिक प्रयत्नांतून तसेच कामाच्या ठिकाणी सुरक्षितपणे काम करण्याचे प्रशिक्षण देऊन व्यवस्थापन व कामगारांमध्ये जागृती निर्माण केल्यास अपघातांची संख्या निश्चितपणे कमी करता येईल. अपघातांमध्ये जखमी होणारे कामगार व मृत झालेल्या कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून कार्यवाही करण्यात येते.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत तयार करण्यात आलेल्या नवी संकेतस्थळावर कारखाने अधिनियम, १९४८ व त्या अंतर्गत महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मध्ये याबाबतची संपूर्ण माहिती तसेच संचालनालयामार्फत देण्यात येणा-या विविध सेवांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. याशिवाय अपघाताच्यावेळी उपयोगी पडणा-या विविध विभागांच्या संकेतस्थळांची माहिती, परस्पर सहाय्यता गटाच्या संकेतस्थळाची माहिती, जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा, सक्षम व्यक्ती, प्रमाणक शल्य चिकित्सक, सुरक्षा लेखा परिक्षक तसेच धोकादायक रसायनांच्या गुणधर्माबाबतची माहिती देण्यात आली आहे.

प्रधान सचिव,<br>
कामगार विभाग<br>
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई